

आजचा रंग : राखाडी

राखाडी रंग म्हणजे अद्वितीयता आणि यशाचे प्रतिक

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २१ ऑक्टोबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



सोलापूरचे कलाकार विपुल मिरजकर यांच्या टीमने नवरात्री निमित्त १० किलो तांदूळ भाजून त्यांच्या रंगछटा तयार करून त्यापासून कोल्हापूर महालक्ष्मी देवीची प्रतिमा साकारलेली आहे.

# देवरुपी डॉक्टरांनी टाळलं; तिऱ्हेच्या म्हसोबानं पावलं!

**पिडा अन् साडेसाती निघून गेली..!**

## ▸ त्या पीडित महिलेच्या मामाची भावूक, हृदयस्पर्धी भावना

✔ सुराज्य/सोलापूर

**माझ्या भाचीला देवरुपी डॉक्टरांनी उपचारासाठी टाळलं, मात्र आमच्या गावचा तिऱ्हेच्या म्हसोबानं तिला पावलं. तिच्या मागची पिडा अन् साडेसाती निघून गेली, तीने सुखरूप बाळाला जन्म दिला, यातच आम्ही धन्य मानलो, अशी हृदयस्पर्धी आणि भावूक प्रतिक्रीया होती त्या पिडीत असह्य अशा वेदनेने तडपडणाऱ्या त्या गरोदर मातेच्या मामांची.**




मामा पुढे म्हणाले, म्हसोबा च्या कृपाआशिर्वादानं आमच्या मागची साडेसाती अन् काळ निघून गेला. तिची नॉर्मल डिलेव्हरी झाली. आणि आम्ही सुखरूप घरी आलो. अन्यथा अनर्थ झाला असता.

त्या पिडीत महिलेचे मामा खूपच भावुक झाले होते. ते म्हणाले, दि. ४ सप्टेंबर २००३ रोजीची घटना. होयं..! तिनं यातना, पिडा सोसल्या. तब्बल तीन-चार तास कळा सहन सहन केली. प्रसूती काळाच्या वेदना जणूकाही तिचा जीवच घेतील की काय? अशी भिती वाटत होती. एकीकडे जिथे आम्ही उपचारासाठी आणलं ते तर बंदच. ना डॉक्टर ना नर्स, आशावर्कर, सेवक येथे तर कोणीच नव्हतं. रात्रीची वेळ. वेदनेने ती तडपडत होती. रात्री नऊ वाजल्यापासून रात्री साडेबारा वाजेपर्यत डॉक्टर येतील, या आशेने आम्ही त्यांची वाट पहातच होतो. रात्रीची वेळ दवाखाना बंद. अशावेळी करायचे काय? शेवटी नाईलाज म्हणून संबंधित महिला डॉक्टरांना फोन लावला. आठ ते दहावेळा त्यांना फोन केला. त्यांनी फोनच उचलला नाही. अखेर त्यांनी फोन उचलला आणि दहा मिनिटांत आशावर्करला पाठवून देण्यात येईल, असे समोरून सांगण्यात आले. आशावर्कर आल्या आणि अवघ्या दहाच मिनिटात तिची डिलेव्हरी, प्रसूती करून आम्हाला घरी पाठवून दिलं.

भाचीला चक्कर येत होती. यासंदर्भात सांगूनही दखल घेतली गेली नाही. आम्हाला सोलापूरला जायचे आहे, असे सांगून त्या निघून गेल्या. रात्रभर घरी जागून आम्ही बाळ आणि बाळंतणीची सेवा केली, काळजी घेतली.

प्रसूतीनंतर एखाद्या रुग्णाला २४ तास डॉक्टरांच्या निगराणीखाली ठेवणे बंधनकारक असतानादेखील त्यांनी तसे न करता डिलेव्हरी झाल्या झाल्या घरी पाठवून दिलं. जर बर वाईट काही झाल असतं तर?






### प्रसुतीनंतर अवघ्या दहाच मिनिटात घरी पाठवलं!

माझ्या भाचीने अत्यंत असह्य अशा वेदना, कळा, यातना सोसून बाळाला सुखरूप जन्म दिला. बाळंतपणं झाल्यानंतर अवघ्या दहाच मिनिटांत आम्हाला घरी पाठण्यात आलं. भाचीला चक्कर येत होती. नुकतच जन्माला आलेल बाळ. अशा गंभीर परीस्थितीत घरी गेल्यानंतर आम्ही तिची रात्रभर सेवा केली. पहिल्या दिवशी तरी नाहीच. दुसऱ्यादिवशीदेखील कोणी डॉक्टर आले नाहीत. गोळ्या-औषधं द्यायचं तर लांबच राहीलं. जिथं जीवनदान देणाऱ्या डॉक्टरांनी नाकारलं, तिथे नशिबानं, तिऱ्हे गावच्या आमच्या म्हसोबानं पावलं, अन बाळांसह माझ्या भाचीचा जीव वाचला.

### भाचीचा राग सुनेवर तर नाही ना?

त्या पिडीत महिलेच्या प्रसुतीनंतर महिलेच्या मामाच्या सुनेलादेखील डॉक्टरांच्या वाईट वर्तणुकीला सामोरे जावे लागले. तिच्या बाबतीही वाईट अनुभव आलं. असं वाटत भाचीचा राग सुनेवर तर नाही ना? असा अनुभव त्या मामांनी बोलून दाखवलं. मामा म्हणाले, माझ्या भाचीचा विषय तर झालाच. माझ्या सूनेबाबतही येथील आरोग्य केंद्रात अशाच प्रकारची वर्तणूक दिली जात आहे. माझी सून गेल्या दोन महिन्यांपासून गोळ्या मागत होती. तरीपण गोळ्या दिल्या गेल्या नाहीत. यासंदर्भात सदर महिला डॉक्टरला विचारले असता उलट त्यांनी डिलेव्हरी दिवशी त्या रात्री मला उशिरा फोन का केला? म्हणून त्यांनी धमकावलं. तुम्हाला फोन करायचे नाही तर कोणाला फोन करायचे, असा सवाल जेव्हा केला, तेव्हा संबंधीत पुरुष डॉक्टरांनी तर कहरच केलं. खाली आवाजात बोला, अशी सुनावली. काय करायचे आहे करा, अशा शब्दात धमकीदेखील दिली. अशा प्रकारच्या कार्तव्यात कसूर, हलगर्जीपणा करणाऱ्या निष्ठूर डॉक्टरांना जागच्या जागी निलंबित करावे, अशी मागणी त्या महिलेच्या मामांनी 'सुराज्य'शी बोलताना केली आहे.

## सराईत गुन्हेगार तेजस कांबळे स्थानबध्द

✔ सुराज्य/सोलापूर

सराईत गुन्हेगार तेजस धर्मपाल ऊर्फ धर्मप्पा कांबळे (वय-२०, रा.म्हाडा, कॉलनी,गोकूळ नगर, जुळे सोलापूर) याला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे.

शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार तेजस कांबळे हा मागील काही वर्षांपासून सातत्याने घातक शस्त्रांचा वापर, करून जबरी चोरी, मोटरसायकल चोरी, घरफोडी करणे, गैर कायद्याचे मंडळी जमवणे असे अनेक गंभीर स्वरूपाचे एकूण पंधरा गुन्हे दाखल आहेत.



तेजस कांबळे याला त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून प्रवृत्त करण्यासाठी सन २०२१ मध्ये कारवाई केली होती. त्यानंतरही तेजस कांबळे यांच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा होईल अशी गुन्हेगारी कृत्य चालूच ठेवली. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी स्थानबद्धतेचे आदेश देत त्याची पुणे येथील येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

## दरोडा टाकणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील तिघे जेरबंद

**आरोपींकडून ६ लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त**

✔ सुराज्य/सोलापूर

शस्त्रांचा धाक दाखवून दहशत माजवून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली अटक केली. टोळीकडून ६ लाख १४ हजार रुपये पोलिसांनी हस्तगत केले.

११ ऑक्टोबर रोजी पहाटे बालाजी ज्वेलर्स निलम नगर येथे चोरी केलेल्या टोळीतील आरोपी राहुल रविंद्रसिंग भोंड, (रा.हडपसर) व सूरज प्रकाश चव्हाण एमआयडीसीच्या पोलीस कोठडीत आहे. पोलिसांनी चव्हाण याचेकडे घरफोडीबाबत कसून चौकशी केली असता त्याने चोरीतील उर्वरित दागिने प्रेम काशीनाथ कोळी याच्याकडे असल्याचे सांगितले. त्यावरून कोळी यास कलावती नगर येथून अटक करून त्याच्याकडून बालाजी ज्वेलर्स मधून चोरलेल्या दागिन्यांपैकी २ किलो चांदी व १ ग्रॅम सोने जप्त केले. आरोपी प्रेम कोळीसह त्याचे इतर दोन साथीदार तिलकसिंग टाक व हंसराज टाक हे पळून जात होते. पो.स.ई. रजपूत यांनी त्यांच्या वाहनाच्या टायरच्या दिशेने फायरिंग केले होते. त्यात दोन आरोपी पळून गेले होते.रजपूत यांनी प्रेम कोळी यास अटक करून चोरीसाठी वापरण्यात आलेली वाहने व मुद्देमाल जप्त केला.

## स्कार्प मळणी यंत्रात अडकून महिला ठार

**बार्शी तालुक्यातील घटना**

✔ सुराज्य/सोलापूर

बार्शी तालुक्यातील तांदुळवाडी गावातील स्वतःच्या सोयाबीन पिकाची मळणी करत असताना महिलेच्या डोक्याला बांधलेला स्कार्प हे मळणी यंत्रात अडकल्याने डोके अडकून ती जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवार २० ऑक्टोबर रोजी दुपारी घडली.

नंदा भास्कर गरड (वय ६१, रा. तांदुळवाडी, ता. बार्शी) असे ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. भानुदास बापूराव गरड (वय ५९) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २० ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी भास्कर गरड याच्या शेतात सोयाबीन मळणीसाठी यंत्र आले होते, त्यासाठी नंदा भास्कर गरड व त्याचा मुलगा रामराजे असे तिघेजण स्वतःच्या शेतात गेले असताना मळणी यंत्र चालू केले. नंदा ही मळणी यंत्र चालू असताना त्या मळणी यंत्राच्या खाली पडलेले सोयाबीन पिकांचे दाणे गोळा करत होती. तिने तिच्या डोक्यावर बांधलेला स्कार्प व डोक्याचे केस हे ट्रॅक्टर व मळणी यंत्र जोडणाऱ्या फिरत्या रोडला अडकल्याने तिचे डोकेही फिरत्या रॉडमध्ये अडकले. तिच्या डोक्याला गंभीर जखम झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.



याबाबत पांगरी पोलिसात आकस्मात नोंद होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपात्रे व पोलीस उपनिरीक्षक नंदकुमार काशीद हे घटनास्थळाला भेट दिली.

## हार्दिकमुळे भारताचा बॅलेन्स बिघडला

✔ **मुंबई** : हार्दिक पांड्या दुखापतीमुळे न्यूझीलंड विरोधातील सामन्यासाठी उपलब्ध नाही. हार्दिक पांड्यामुळे टीम इंडियाला गोलंदाजी आणि फलंदाजीमध्ये संतुलन मिळत होते. रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये लढत होणार आहे. रविवारी भारतीय संघात दोन बदल होण्याची शक्यता आहे. हार्दिक नसल्यामुळे संघाचा बॅलेन्स बिघडला आहे. हार्दिक नसल्यामुळे शार्दूल ठाकूरलाही संघाबाहेर बसावे लागू शकते. कारण, शार्दूल ठाकूर महागडी गोलंदाजी करतो.

## ग्रामपंचात निवडणूक : शेवटच्या दिवशी सदस्यपदासाठी २०९० उमेदवारी अर्ज

**२३ ऑक्टोबरला छाननी, २५ ऑक्टोबरला माघार**

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचात निवडणूकिसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सरपंच पदासाठी ४२० तर सदस्यसाठी २०९० अर्ज दाखल झाले आहेत.२३ ऑक्टोबरला दाखल उमेदवार आर्जची छाननी होणार आहे. तर २५ ऑक्टोबर दुपार तीनपर्यंत उमेदवारी अर्ज मघार घेण्याची वेळ आहे.

जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुका वगळता दहा तालुक्यातील १०९ ग्रामपंचातीची निवडणूक प्रक्रिया चालू आहे.१६ ते २० आक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ होती. यामध्ये करमाळा मधिल१६, माढा मधिल १४, बार्शीतील ५ मोहोळ मधिल २, पंढरपुरातील ३, माळशिरस मधिल १०, सांगोला ४,मंगळवेढा २७, दक्षिण सोलापूर १०, अक्कलकोट १८ ग्रामपंचातीचा समावेश आहे. १०९ ग्रामपंचाती मधिल ३६८ प्रभागामधिल ९४५ सदस्य आणि



१०९ सरपंच पदासाठी निवडणूक होत आहे. ४३ ग्रामपंचातच्या ५० प्रभागातील ३५ सदस्य आणि माळशिरस आणि माढा मधिल दोन ग्रामपंचातीच्या सरपंच पदासाठी पोटनिवडणूक होत आहे. सदस्यसाठी आता पर्यंत सदस्यासाठी ६४ तर सरपंचपदासाठी ६ अर्ज दाखल झाले आहेत.

शुक्रवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवट्या दिवशी करमाळा तालुक्यात सदस्यसाठी ३९३ तर सरपंचपदासाठी ७५, माढा मध्ये सदस्यसाठी २५१, सरपंचपदासाठी ४६, बार्शी मध्ये सदस्यसाठी १६ तर सरपंचासाठी ३९, मोहोळ मध्ये सदस्यासाठी ३३ तर सरपंचपसाठी ७, पंढरपुरात सदस्यसाठी ८९, सरपंच १५. माळशिरसमध्ये सदस्यसाठी १९३, सरपंचपदासाठी २१०, सांगोला मध्ये सदस्यासाठी १४६ सरपंचपदासाठी ३७, मंगळवेढा मध्ये सदस्यासाठी सर्वाधिक ५८५ तर सरपंचपदासाठी १०३, दक्षिण सोलापुरात सदस्यासाठी १६६ सरपंचपदासाठी २४ अक्कलकोटमध्ये सदस्यासाठी २१८ तर सरपंच पदासाठी ५३ आतापर्यंत दिवसात सदस्यासाठी २०९० तर सरपंच पदासाठी ४२० उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी दिली.

### ५ नोव्हेंबर रोजी मतदान

२३ ऑक्टोबर रोजी दाखल अर्जाची छाननी. २५ ऑक्टोबर दुपारी तीन वाजे पर्यंत दाखल उमेदवारी माघारी घेण्याचा शेवटचा दिवस आहे. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे सात ते साडेपाच पर्यंत मतदान, ६ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या कंपन्या सेल सुरु करतात, मग मी काही दिवस इथं येतो !!

कल्याण
229-35-447

मुंबई
145-04-789

## ललित पाटील प्रकरणात फडणवीसांचा गंभीर आरोप

# उद्धव ठाकरेंसोबतच्या कनेक्शनबाबत खळबळजनक दावा

✔ सुराज्य/सोलापूर

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात ड्रग्ज माफिया ललित पाटील हे नाव प्रचंड चर्चेत आहे. ललित पाटील हा ससून रुग्णालयात पोलिसांच्या ताब्यात असताना पळून गेला होता. यानंतर विरोधकांनी शिंदे-फडणवीस सरकारवर ताशेरे ओढताना ललित पाटील प्रकरणात सत्ताधाऱ्यांचा सहभाग असल्याचा आरोप केला होता. या पार्श्वभूमीवर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत एक गौप्यस्फोट केला. यावेळी फडणवीसांनी ललित पाटील आणि उद्धव ठाकरे यांच्यातील संभाव्य कनेक्शनवर बोट ठेवले. त्यामुळे आता या सगळ्याला ठाकरे गट कशाप्रकारे प्रत्युत्तर देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.



ललित पाटील याला डिसेंबर २०२० मध्ये अटक झाली. त्यावेळी उद्धव ठाकरे हे राज्याचे मुख्यमंत्री होते. उद्धव ठाकरे यांनीच ललित पाटील याच्याकडे तेव्हाच्या शिवसेनेचे नाशिक जिल्ह्याचे प्रमुखपद सोपवण्यात आले होते. ललित पाटील याला अटक झाल्यावर लगेच पीसीआर मागण्यात आला. गुन्हा मोठा असल्याने याप्रकरणात लगेच पीसीआर देण्यात आला. ललित पाटील याला पीसीआर मिळाल्याबरोबर त्याला लगेच ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर सरकारी पक्षाकडून ललित पाटीलच्या चौकशीसाठी कोणताही अर्ज करण्यात आला नाही. पोलिसांकडून पाटील याची चौकशीच झाली नाही. पीसीआरचा १४ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर ललित पाटील याला एमसीआर द्यावा लागला. या काळातही त्याची चौकशीच झाली नाही. चौकशी झाली नसेल तर उद्या एखाद्या आरोपीविरुद्ध न्यायालयात खटला भरायला झाला तर तो कसा भरणार?, असा सवाल देवेंद्र फडणवीसांनी उपस्थित केला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना पाटीलची चौकशी का झाली नाही? यामागील कारण काय होतं? या सगळ्याला ठाकरे जबाबदार होते की गृहमंत्री जबाबदार होते. पाटीलची चौकशी न करण्यासाठी कोणाचा दबाव होता. या प्रकरणात खूप गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पण मी आत्ताच सांगणार नाही, असे सांगत या प्रकरणातील सस्पेन्स कायम ठेवला.

### कंत्राटी भरतीचा जीआर रद्द

या पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस यांनी कंत्राटी भरतीचा जीआर रद्द करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. आधीच्या सरकारांनी केलेले पाप आपल्या माथी नको, अशी भूमिका त्यांनी मांडली. कंत्राटी भरतीवरून युवकांच्या मनात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र या भरतीला सुरुवात काँग्रेस-राष्ट्रवादीनेच केली होती. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना शरद पवार यांच्या आशीर्वादाने त्यांनीही कंत्राटी भरतीची निविदा काढली होती. मात्र हे लोक स्वत:चं पाप आमच्या माथी फोडण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली असून कंत्राटी भरतीचा जीआर आम्ही रद्द करणार आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.